# 21 व्या शतकातील स्त्रिपुढील आव्हाने

स्वातंत्र्य, क्षमता, बंधुता, न्याय हे मानवाचे मुलभूत हक्क आहे. मानव म्हणजे स्त्री पुरूष हे दोन्हीही. परंतु आजही कुटूंब व समाज यात स्त्रिला दुय्यम स्थान आहे. त्यामुळे तिचे व्यक्तीमत्व पूर्णपणे विकसित होउ शकत नाही. स्त्री–पुरुष विषमता ही जागतिक समस्या आहे.

आज स्त्री विविध क्षेत्रात आघाडीवर आहे. औद्योगिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात ती आज कार्यक्षमतेने कार्य करत आहे. एवढे असुनही ती सुरक्षित नाही.

भारत सरकारने 2001 हे वर्ष ' महिला सक्षमीकरण ' म्हणून जाहीर केले आहे. जागतिक स्तरावरील 1985 ते 1995 हा काळ 'महिला दशक' म्हणून घोषित केला आहे. युनोने 1995 मध्ये 'जागतिक महिला वर्ष ' म्हणून जाहीर केले होते.

फक्त स्त्री साक्षर होवुनच चालणार नाही तर शिक्षणाबरोबर ती आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होणे आवश्यक आहे. स्त्रियांवर होणा–या अत्याचाराचे व अन्यायाचे एक प्रमुख कारण म्हणजे आर्थिक परावलंबन हे आहे. कारण आर्थिक परावलंबनातूनच आत्मविश्वास वाढतो व अन्याय, अत्याचाराविरूध्द आवाज उठवण्याची ताकद वाढते. याकरिता स्त्रीने नौकरीच केली पाहीजे असे नाही तर स्वयंरोगाराराच्या माध्यमातूनही ती आर्थिक बाबतीत स्वावलंबी बनू शकते.

राजकारणातील स्त्रियांचा सहभाग व अल्पयोगदान हा एक आव्हानाचा विषय आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या जोमाने व भरपूर संख्येने राष्ट्रीय, राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग राहिला, तुलनेने अत्यंत अल्प सहभाग नंतरच्या काळात दिसून येतो. राजकीय क्षेत्र हे मुख्यतः पुरूषांचे क्षेत्र मानले गेल्याने सामाजिक दृष्टिकोन तसेच सर्वच राजकीय पक्ष स्त्रियांच्या सहभागाबाबत उदासीन असल्याने स्त्रिया अपेक्षित त्या संख्येने येथे आढळत नाहीत. पक्षसंघ्टनेमध्येही निर्णय घेणा–या प्रक्रियेतील उच्च पदावरील स्त्रियांची संख्या अत्यंत कमी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये 30 टक्के आरक्षण लोकसभेने मंजूर केले आहे कारण त्याचा त्यांच्याशी सरळ संबंध नव्हता. मात्र जेथे त्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत अशा राज्यसभा व लोकसभेत हे आणण्याकरिता काय काय प्रतिक्रया होतात हे सर्वविदितच आहे. मनुष्यबळ विकासाचे कार्यक्रम आखतांना, राबवित असतांना 48 टक्के लोकसंख्येचा भाग असलेल्या महिलांच्या विकासासाठी शासकीय, खाजगी व स्वयंसेवी संस्थातर्फे प्रयत्न केले जातात. परंतु महिलांचा राज्यातील एकूण उत्पन्नातील, उत्पादनातील सहभाग अत्यंत अल्प आहे. शहरी विभागातील महिलांच्या ग्रामीण महिलांपेक्षा आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक जाणीवा बदललेल्या असल्या तरीही अजूनही एकटीने काही करण्याचे सामर्थ्य बहुतांशी महिलांमध्ये आढळत नाही. आजही स्त्रीच्या कार्यकर्तृत्वाला पुरूषी अहंकार व पुरूषप्रधान संस्कृतीला तोंड देतच मार्ग काढावा लागत आहे. कामगार स्त्रियांचे प्रमाण आज खूप वाढले आहे. घरात गृहिणी, पत्नी, आई म्हणून व बाहेर कामगार म्हणून दुहेरी भूमिका बजावतांना होणारी ससेहोलपट त्यांचे वाटेस येउ लागली.

स्वातंत्र्य मिळाले पण स्त्रीला सुरक्षितता न मिळता उलट स्त्रियांवरील अन्यायाचे प्रमाण



Scanned with ACE Scanner

वाढले आहे. वास्तविक स्त्रीला दुय्यम स्थानावरून समान पातळीवर येउन जीवन जगता यावे यासाठी अनेक कायद्यांची निर्मिती झाली. हुंडापध्दतीने विपर्यस्त रूप धारण करताच डॉवरी प्रोहिबिशन ॲक्ट निर्माण झाला. पण याबाबत कितीही कायदे झाले असले तरी त्यामागे समाजाची सुजाण शक्ती असल्याशिवाय ते कायदे म्हणजे कागदी घोडे नाचविणेच असते. शाहबानो प्रकरणात 'तलाक' शब्दाच्या तीन फटका–यांनिशी मुस्लीम स्त्रीच्या जीवनाचे नाहिसे होणारे स्थैर्य व उध्वस्त होणारे जीवन यापासून मुस्लिम स्त्रियांचा बचाव व्हावा, यासाठी तिने सतत लढा दिला परंतु समाजातील स्वार्थी व दुष्ट शक्तींनी कायदा हाती घेउन सरकारवर दबाव आणून घटनेत हवी तशी दुरूस्ती करून घेतली. स्त्रीमुक्ती चळवळ ही आज एका वेगळ्या मार्गाने प्रवास करीत आहे. कारण स्त्रियांपुढील आव्हाने व चळवळीचे ध्येय यामध्ये एकवाक्यता, समानता दिसून येत नाही.

जग बदलत आहे आणि विस्तारत आहे. जगण्याची शैली बदलते आहे आणि नविन आव्हाने दरवाजे ठोठावत आहेत. कालानुरूप आपणही बदलतो आहोत. पण पुरेसे बदलत आहोत का याचा विचार करायला हवा. राज्य, राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्रियांचे कर्तुत्व बहरत असतांना, त्यांना अत्युच्च सन्मान प्राप्त होत असतांना त्याचा लाभ किती स्त्रियांना होत आहे हे बघणे उद्‌बोधक ठरेल. मुख्य म्हणजे स्त्रीचा 'स्त्री' म्हणून विचार होतो आहे ही व्यक्ती म्हणून हेही जाणून घेणे महत्वाचे ठरणार आहे.

## स्त्रीपुढील सामाजिक आव्हाने

**1. स्त्री भ्रूणहत्या :–** महिलाचे सामाजातील कमी होणारे प्रमाण हा एक महिलांकरिताच चिंतेचा विषय आहे. एक हजार पुरूषामागे असणारे स्त्रियांचे प्रमाण फार कमी होत चालले आहे. स्त्रि स्वतःच्याच गर्भात स्त्रिभ्रूण वाढवू शकत नाही यापेक्षा तिच्यासाठी लज्जास्पद गोष्ट कोणती असेल? भारतातील प्रत्येक राज्यात स्त्रियांचे प्रमाण कमी होतं आहे. खोंड लोकांची अशी समजून होती की कुटूंबात एकदा जन्म घेतलेली आत्मा पुन्हा पुन्हा त्याच कुटूंबात जन्म घेतो. जन्माच्या तिस–या दिवशीचे संस्कार नवजात अर्भकावर झाले की मग त्या अर्भकाचा आत्मा कायम त्या कुटूंबाशी बांधला जातो म्हणून नको असलेली मुलगी जन्माला आल्यावर तिच्यावर संस्कार होण्या अगोदर मारून टाकले तर, त्या मुलीचा आत्मा कायमचाच त्या कुटूंबातून हददपार होतो असा समज होता. मुलगी नको म्हणजे एका जन्मापुरतीच नव्हे? तर भविष्यातूनही तिचे अस्तित्व पुसून टाकण्याची ही वृत्ती प्रत्यक्ष बालहत्येपेक्षाही जास्त कुर वाटते. याचे समाजावर खूप वाईट परिणम होणार आहे. समाजाचे सातत्य व अस्तित्व प्रजोत्पादनावर अवलंबून असते. समाजात प्रजोत्पादनावर अवलंबुन असते.

समाजात प्रजोत्पादनाचे कार्य स्त्री पुरूष यांच्या सहकार्याने चालते पण जर स्त्री उपलब्ध झाली नाही तर कोणाला जन्माला घालावे हा प्रश्न निर्माण होईल. याचा समाजाच्या विकासावर प्रभाव पडेल. स्त्रियांविरूध्दच्या हिंसाचारात वाढ होईल. याकरिता स्त्रिनेच पुढाकार घेणे आवश्यक आहे. कायद्याचा आधार घेउन लिंग निवडीस विरोध करायला पाहिजे. मुलांप्रमाणेच मुलगी पण वंशाचा दिवा आहे याचा विचार समाजात रूजविणे आवश्यक आहे. व समाजातील स्त्रिचे कमी होणारे प्रमाण वाढविणे पण स्त्रिच्याच हातात आहे. स्त्रि–भ्रूणहत्येमुळे होणारे जे दुष्परिणाम आहेत

Scanned with ACE Scanner

ते स्त्रिलाच भोगावे लागणार आहे.

2. **हुंडा पध्दत** :– ब–याच समाजामध्ये हुंडा पध्दत आहे. या हुंडा पध्दतीमुळे स्त्रि–भ्रूणहत्या घडून येत आहे. मुलगी झाली की बराच हुंडा द्यावा लागतो हा समज समाजात आहे त्यामुळे मुलगी नवोच असे लोकांना वाटते.

ही हुंडा पध्दत बंद करणे आवश्यक आहे. मुलींना जर चांगले शिक्षण देउन स्वतःच्या पायावर उभे केले, आर्थिक बाबतीत तिला सक्षम केले तर या हुंडा पध्दतीवर अंकूश लागू शकतो व हे काम महिलाच चांगल्या रितीने करू शकतात.

3. **बालविवाह** :– स्त्रियांच्या शिक्षणाला सर्वात मोठा अडथळा जर कोणता असेल तर तो विवाहाचा. आपल्या समाजात विवाहाला अनन्यसाधारण महत्व आहे. आजही ग्रामीण भागात अल्पवयीन मुलींचे लग्न सर्रास होते.लग्न झाल्यावर शिक्षण नसल्याने ती परावलंबी होते. कमी वयातच तिच्यावर मातृत्व लादल्याने तशी ती शारिरीक दृष्ट्या कमजोर झालेली असते. मुलगी वयात आल्यावर तिच्या मनात कोणत्याही पुरूषाबद्दल विचार येण्या आधीच तिचे लग्न करून दिल्या जाते. काही राज्यात तर अगदी लहानपणीच तिचे लग्न लावुन दिल्या जाते. तिला लग्नाचा, पतीचा अर्थही समजत नाही, केवळ लग्न म्हणजे चांगली तयारी करायला मिळते, नविन कपडे मिळतात हेच माहिति असते. लग्नासाठी तिचे शरीर व मन दोन्हीही तयार नसते. तिची शारिरीक वाढ पूर्ण झालेली नसतांना मातृत्व तिच्यावर लादले जाते. त्यामुळे जोपर्यत स्त्रि शारीरिक व मानसिक रितीने परिपक्व होत नाही तोपर्यत तिचा विवाह होउ देउ नये. हे स्त्रि पुढील आव्हान आहे.

4. **लैंगिक छळ** :– स्त्री नोकरी करणारी असो की घरी राहणारी असो तिच्यावर नेहमी लैंगिक अत्याचार होत असतात.' लैंगिक शोषण' यात स्त्रीकडे रोखून पाहाणे, गर्दीच्या ठिकाणी एखाद्या स्त्रीला नको तिथे जाणून बुजून स्पर्श करणे, डोळा मारणे, डोळ्यामध्ये विचित्र भाव आणून स्त्रीकडे पाहाणे, ओठाच्या वेड्यावाकड्या हालचाली करणे, चुंबन घेण्याचा अविर्भाव करणे, तसा आवाज करणे, कायम व्दिअर्थी बोलणे, स्वतःच्या खाजगी भागाकडे स्त्रियांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणे, बेसावधपणे स्त्रीच्या मागे येउन उभे राहणे, पत्नीची इच्छा नसतांना तिच्याशी संबंध ठेवणे, नको असतांना तिच्यावर गर्भारपण लादणे इत्यादी गोष्टींचा समावेश होतो.

नोकरीच्या!, व्यवसायाच्या निमित्ताने आलेले अनुभव फारसे सुखावह नसतात. नोकरीच्या निमित्ताने बाहेर पडणा–या स्त्रियांनाच असे अनुभव येतात असे नाही. तर घरात राहणा–या स्त्रियांनाही विशेषतः एकत्र कुटूंब जिथे आहे तेथेही स्त्रियांना हे अनुभव येतातच. घरातील व्यक्ती लैंगिक शोषण करते पण बोलण्याची सोय नसते. कारण त्या व्यक्तीची प्रतिष्ठा, कुटूंबाची प्रतिष्ठा मोठी आणि महत्वाची. पुरूषाच्या दृष्टीने स्त्री ही केवळ एक भोगवस्तू आहे का? हा महत्वाचा प्रश्न आहे व पुरूषाच्या मनातून ही गोष्ट काढून टाकणे, स्त्री व पुरूष हे समान आहे हे त्यांना समजावून सांगणे हे पण एक आव्हानच स्त्री समोर आहे.

5. **शिक्षण** :– पुर्वी स्त्रिया अशिक्षित होत्या. त्यांचे क्षेत्र म्हणजे चूल आणि मुल हेच होते. त्यांना

Scanned with ACE Scanner

कुठेही मानाचे स्थान नव्हते. . आज भारतात जवळपास 5 हजार आय.ए.एस. अधिकारी असले तरी यापैकी स्त्री अधिकारी 500 हून अधिक नाही. साधनांची कमतरता, सुरक्षेचा अभाव, लिंगभेद इत्यादी कारणामुळे मधेच शिक्षण सोडणा—या मुलींची संख्या अधिक आहे. 1980 च्या दशकात स्वयंरोजगार करणा—यांपैकी 50 टक्के स्त्रिया अशा आहेत की ज्यांच्यावर कुटूंबाचा पूर्ण भार आहे. मुलीने शिकून काय करायचे? हा विचार ब--याच समाजात रूढ झालेला आहे.

स्त्रियांचा सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी स्त्रि शिक्षणाची संकल्पना व्यापक स्वरूपात राबविली पाहिजे. स्त्रियांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. एक स्त्रि शिक्षित झाली तर ती पूर्ण घर शिक्षित करते. अजुनही शिक्षणापासून लाखे स्त्रिया दूर आहेत हे कटू असे तरी सत्य आहे. झालेल्या प्रगतीने हुरळून न जाता शिक्षण हे सर्व स्तरातील स्त्रियांना मिळाव यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

6. **मालमत्तेत सहभाग** :— स्त्री पुरूष समानता आहे अशी कितीही ओरड केली तरीही स्त्रिला समाजात दुय्यम स्थान आहे. ज्यावेळी वडीलोपार्जित संपत्तीची वाटणी केल्या जातात त्यावेळेस मुलींना तुमचा वाटा नाही ही संपत्ती फक्त मुलांचीच आहे असे सांगितले जाते. दुस—यांच्या घरी जायचे म्हणून शिक्षण नाही व शिक्षण नाही म्हणून आर्थिक पाठबळ नाही. कितीही कायदे स्त्रियाकडून असले तरी त्या कायद्याचा उपयोग तिला होत नाही असे चित्र आपल्याला दिसते.

7. **अंधश्रध्दा** :— स्त्रीने परंपरागत चालत असलेल्या व्रतवैकल्यांचे वैज्ञानिक कसोटीवर अवलोकन करून ते स्विकारावे अथवा नाकारावे, रूढीतून आज कालबाह्य होउ पाहणारी व्रतवैकल्ये टाळली पाहिजे. मुलगा पाहिजे ही जी संकल्पना आहे तिला स्त्रिनेच विरोध केला पाहिजे. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा असे जे आपल्याकडे म्हटले जाते तसेच मुलगी पण वंशाचा दिवा आहे असे मानल्या गेले पाहिजे. मुलगा होत नाही तोपर्यंत मुलीच मुले जन्माला घातल्या जाते असे चित्र ग्रामीण भागात पाहायला मिळते त्यामुळे स्त्रिची किती शारिरीक हानी होते याचा विचार केल्या गेला पाहिजे. शिक्षणास प्रोत्साहन देउन ग्रामीण भागातील स्त्रियांना सामाजिक आणि धार्मिक रूढीच्या बंधनातून मुक्त केले पाहीजे हे कार्य करण्यासाठी सुशिक्षित स्त्रियांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे अनेक आव्हाने स्त्रीसमोर आहे. स्त्रीला जर आपले अस्तित्व टिकवायचे असेल तर तिला सक्षम बनने आवश्यक आहे. समाजातील असलेल्या अनिष्ठ, रूढी, परंपरा यांचा विरोध करणे आवश्यक आहे. आतापर्यंत तिच्यावर फक्त अन्याय, अत्याचारच होत होते परंतु आता तिचे अस्तित्व व तिलाच नष्ट करण्याचा प्रयत्न समाजाने चालु केला आहे. यासाठी तरी तिला कणखर बनने आवश्यक आहे. समाजातील तिचे कमी होणारे प्रमाण हेच या गोष्टीची साक्ष देते. आणि हे जर आता थांबविल्या गेले नाही तर त्याचे दुरगामी परिणाम स्त्रियांना भोगावे लागतील. तिच्यावर होणा--या अन्यायात, अत्याचारात जास्तच वाढ होईल. आतापर्यंत बहुपत्नीत्व प्रथा होती परंतु यानंतर बहुपतीत्व प्रथा समाजात रूढ होईल.

प्रा. सरोज या. लखदिवे,
इंदिरा महाविद्यालय, कळंब,
जि. यवतमाळ.

Scanned with ACE Scanner